# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensational Crimes**

**Police Station** :- **Jaulka Rly**

**Date of Good Work done** :- **19/07/2022**

**Brief of the work done :-**

ग्राम डव्हा-चाकातीर्थ येथे वृद्ध दाम्पत्यांच्या दुहेरी हत्याकांडातील फरार आरोपीस अटक.

**क्राइम-न्यायालयातून**

## दुहेरी हत्याकांडातील एका फरार आरोपीस पकडण्यात पोलिसांना यश

देशोन्नती वृत्तसंकलन...



**जउळका रेल्वे** ■ मालेगाव तालुक्यातील डव्हा येथील चाकातीर्थ येथे दोन वृद्ध पती पत्नीचा खून करण्यात आला होता. सदर प्रकरणी पो.स्टे. जऊळका येथे अप.क्र.३४१/२१ कलम ३०२, ३४ भादवि. नुसार गुन्हा नोंदविण्यात आला होता.

वृद्ध दाम्पत्याच्या निघृण अश्या या दुहेरी हत्याकांडाने जिल्हाभरात खळबळ उडाली होती. घटनास्थळी पुरेशे सबळ पुरावे मिळून आलेले नसतांना पोलीस पथकाने आपले कसब पणाला लावून तांत्रिक बाबींच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. संबंधित प्रकरणी तपासचक्रे वेगाने फिरवत ०२ आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर हत्याकांडात अजूनही आरोपींचा समावेश असण्याची शक्यता असल्याने त्यादृष्टीने तपास करण्यात येऊन सदर प्रकरणातील मुख्य आरोपी नामें सुनील जयराम खरात, वय ३५ वर्षे, रा. डव्हा, ता. मालेगाव, जिल्हा. वाशिम हा हत्याकांडापासून फरार होता व आपली ओळख लपवून राहत होता. वाशिम जिल्हा पोलीस दलामार्फत त्यास शोधण्याचे अथक प्रयत्न करूनही तो मिळून येत नव्हता. आज गुप्त बातमीदाराकडून प्राप्त माहितीच्या आधारे मुख्य आरोपीस आज डव्हा शेतशिवारातून पो.स्टे. जऊळका येथील तपास पथकाने शिताफीने ताब्यात घेतले. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे, उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत केडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे. जऊळका येथील ठाणेदार सपोनि. अजिनाथ मोरे, पोउपनि पाटील, पोउपनि गोरे, नापोकॉ.१२४४ काळदाते, चानापोकॉ. ७९८ काटेकर, पोकॉ. १२१९ कावरखे, पोकॉ.१२३ भूरकाडे यांनी पार पाडली.